पुणे शहराची भविष्यातील गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करण्यात येणार >> पान 2

शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी... >> पान 3

नेत्याला अखेरचा निरोप लोणार मध्ये भावनिक अस्थिकलश दर्शन >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.-- अज्ञात

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 175 ■ बुधवार, दि. 04 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा, अदिती भाटिया यांचे नवे पोस्टर रिलीज होताच चर्चेत 'केरल स्टोरी-२'

आतील पान

# पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक भूसंपादन गतीने पूर्ण करावे

## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्ट निर्देश
## ■ मुख्यमंत्र्यांनी घेतला महत्त्वाच्या भूसंपादन प्रकरणांचा आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करुन एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूर बरोबरच नाशिक,



छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. यादृष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विविध जिल्ह्यातील 'एमआयडीसी'च्या भूसंपादनाबरोबरच 'एमएसआरडीसी'कडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, >> पान २

# राष्ट्रवादीत घडामोडींना वेग; शरद पवारांचा दिल्ली दौरा अचानक रद्द, पुण्याला रवाना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपला दिल्ली दौरा अचानक रद्द केल्याने राजकीय वतुर्ळात चर्चांना वेग आला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी दिल्लीला जाण्याचे नियोजन असतानाच त्यांनी हा निर्णय घेतला असून, ते मुंबईहून पुण्याकडे रवाना झाले आहेत.




शरद पवार सोमवारी रात्री मुंबईत होते. दिल्ली दौरा रद्द केल्यानंतर त्यांचा आजचा मुक्काम पुण्यात राहणार असून, त्यानंतर ते बारामतीला जाण्याची शक्यता आहे. बारामतीत पुढील दोन ते तीन दिवस त्यांचा मुक्काम असण्याची माहिती आहे. दिल्ली दौरा अचानक का रद्द करण्यात आला, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या नियुक्तीबाबत चर्चा सुरू असताना हा दौरा रद्द झाल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

दरम्यान, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा कारभार हाती घेतला. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतण्यासाठी त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. सुनेत्रा पवार यांच्या राज्यसभेचा कार्यकाळ आणखी दोन वर्षे शिल्लक होता, त्यांची मुदत ४ जुलै २०२८ रोजी संपणार होती. मात्र, ही जागा राखून ठेवण्याऐवजी सहा वर्षांची पूर्ण मुदत >> पान २

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून महत्त्वाची अपडेट, पार्थ पवारांबाबत महत्त्वाचा निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा कारभार हाती घेतला होता. ३१ जानेवारीला सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी पार पडला होता. सुनेत्रा पवार या राज्यसभेच्या खासदार होत्या. या खासदारकीचा राजीनामा देऊन त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यामुळे राज्यसभेची ही जागा रिक्त झाली होती. या जागेवर आता अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सुनेत्रा पवार यांची राज्यसभेची दोन वर्षांची टर्म बाकी आहे. सुनेत्रा पवार यांची राज्यसभेची मुदत ४ जुलै २०२८ ला संपणार होती. मात्र, ही जागा घेण्यापेक्षा पार्थ पवार यांना राज्यसभेची सहा वर्षांची पूर्ण टर्म असलेल्या जागेवर पाठवले जाण्याची शक्यता आहे. लवकरच राज्यसभेची ही जागा भरली जाईल. त्यासाठी पार्थ पवार यांनी मोर्चेबांधणी सुरु केल्याची माहिती आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर पार्थ पवार आणि जय पवार हे दोघेही राजकारणात आणखी सक्रिय होतील, असा अंदाज होता. यापूर्वी या दोघांनी बारामतीमध्ये लोकसभा आणि निवडणुकीच्या >> पान २

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकत्व

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बारामती येथे विमान दुर्घटनेत अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर उपमुख्यमंत्री पदाची धुरा त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यानंतर आता पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. याबाबतचा अधिकृत आदेश मंगळवारी काढण्यात आला.

अजित पवार यांच्या पश्चात सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्री म्हणून राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक आणि औकाफ, तसेच क्रीडा युवक कल्याण ही खाती देण्यात आली. दरम्यान, अजित पवार हे पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर या जिल्ह्यांचे पालकत्व कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होती. अपेक्षेप्रमाणे पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आले आहे. यामुळे अजित पवार यांच्याकडे असलेल्या जबाबदाऱ्या पुढे नेण्याची जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांच्यावर आहे. बीड जिल्ह्यात घडलेल्या वादग्रस्त घटनांनंतर अजित पवार यांनी स्वतः कडे या जिल्ह्याचे पालकत्व घेतले होते. त्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यातील दौरे वाढवले होते. बीडसह पुणे जिल्ह्यातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न सुरू केले होते. तसेच बीड जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अजित पवार यांनी ठोस पावले उचलली होती.

# मुंबई-पुणे प्रवास आता फक्त ४८ मिनिटांत - रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी वाढवण बंदरासाठी थेट जलद रेल्वे जोडणीची घोषणा केली. त्यानंतर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोमवारी २ फेब्रुवारी रेल्वे प्रकल्पांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती दिली. यावेळी त्यांनी राज्यात १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे प्रकल्पांचे काम सुरू असल्याचे सांगून आता लवकरच मुंबई-पुणे प्रवास फक्त ४८ मिनिटांमध्ये करता येईल असे सांगितले.

राज्यात १ लाख ७० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे काम सुरू आहे. यात दुहेरीकरण, चौपदरीकरण अशा मार्गांचा समावेश आहे. राज्यातील दुसरी बुलेट ट्रेन मुंबई-पुणे-हैदराबाद मार्गावर धावणार आहे. याचबरोबर वाढवण बंदराला नव्या समर्पित मालवाहतुकीची जोडणी देण्यात येणार आहे. यामुळे



प्रवासी आणि मालवाहतुकीला गती मिळणार आहे, असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले.रेल्वेमंत्र्यांनी पुढे सांगितले की; कोकण रेल्वेच्या दुहेरीकरणात कवच प्रणाली कार्यान्वित करण्याची प्रक्रिया रेल्वे मंत्रालयाने सुरू केली आहे. तसेच मुंबई उपनगरी रेल्वेवरील गाड्यांची प्रवासी क्षमता वाढवण्यासाठी १५ डब्यांच्या अधिक लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर लोकलची प्रवासी संख्या लक्षात घेता मेट्रोहून अधिक उन्नत आराखड्यात २३८ वातानुकूलित लोकलची बांधणी करण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पात चार हजार किलोमीटर लांबीचा बुलेट ट्रेन विस्ताराचा दुसरा टप्पा जाहीर करण्यात आला. मुंबई-पुणे-हैदराबादसह सात मार्गांचा यात समावेश करण्यात आला आहे. मुंबई-हैदराबाद मार्गावरून राज्यातील दुसरी बुलेट ट्रेन धावणार आहे. यामुळे मुंबई-पुणे अंतर केवळ ४८ मिनिटांत तर पुणे-हैदराबाद हे अंतर एक तास ५५ मिनिटांत पूर्ण करणे शक्य होणार आहे. याचा थेट फायदा मुंबई-पुणेदरम्यान ये-जा करणाऱ्या प्रवाशांना होईल. बुलेट ट्रेनमुळे दोन्ही महत्त्वाच्या शहरांमधील प्रवास अंतर कमी होईल. त्याचबरोबर बुलेट मार्गालगत कंपन्या, शहरीकरण आणि आयटी हब उभारणीमुळे रोजगारातही वाढ होणार असल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे.

# भारत-अमेरिका व्यापार करार, पंतप्रधान मोदी यांचा एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत सत्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार करार झाल्यानंतर आज मंगळवारी (३ फेब्रुवारी) संसद भवनातील एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आलं. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांकडून 'जय म ोदी', 'वंदे मातरम्' आणि 'भारत माता की जय' अशा घोषणा देण्यात आल्या.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी जाहीर केलं की, भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करार झाला असून, त्यानुसार अमेरिकेकडून भारतीय वस्तूंवर लावण्यात येणारा टॅरिफ २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केला जाणार आहे.

दरम्यान, या बैठकीत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचंही औपचारिक स्वागत करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच, पक्षातील अनेक ज्येष्ठ नेते या



बैठकीला उपस्थित होते.

मनोज नरवणे यांच्या पुस्तकातील संदर्भावरून वाद : आज मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर 'आभार प्रस्ताव'वरील चर्चा लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये सुरू राहणार आहे. लोकसभेत हा प्रस्ताव केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी मांडला असून खासदार तेजस्वी सूर्या यांनी त्याला अनुमोदन दिलं. सोमवारी लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान सत्ताधारी एनडीए आणि विरोधी इंडिया आघाडीच्या खासदारांमध्ये जोरदार वाद झाला. राहुल गांधी यांनी चीनसोबतच्या सीमावादाबाबत माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचा संदर्भ दिला होता. भाजपा सदस्यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आणि राहुल गांधी यांनी सभागृहाचे नियम मोडल्याचा आरोप केला.

राज्यसभेत भाजपा खासदार सदानंद मास्टर यांनी आभार प्रस्ताव मांडला. सोमवारी त्यांनी भावनिक भाषण करताना आपले कृत्रिम अवयव सभागृहातील बाकावर ठेवले, ज्यामुळे वातावरण गंभीर झालं होतं.

राहुल गांधींना चीन सीमावादावर चर्चा करायची होती : दरम्यान, सोमवारी लोकसभेत बराच काळ गदारोळ झाला. २०२० मधील चीनसोबतच्या सीमावादावर चर्चा करण्याचा राहुल गांधी यांचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी मनोज नरवणे यांच्या एका अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ दिला. पण यावरून वाद निर्माण झाला. सभापती ओम बिर्ला यांनी अप्रकाशित पुस्तक किंवा लेखाचा उल्लेख करण्यास मनाई केली. दुपारी ३ वाजता सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतरही वाद कायम राहिल्यानं लोकसभा आधी ३ वाजता, नंतर ४ वाजता आणि अखेर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आली.

# देशात पुन्हा परतणार पाऊस

## ९ राज्यात वादळी वाऱ्यासह दमदार पावसाची हजेरी

**दैनिक आपला विदर्भ**

**नवीदिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील बहुतांश राज्यात फेब्रुवारीत एरवी पाऊस पडत नाही. पण बदलत्या हवामानाचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे, भारतातील ऋतुचक्रही पूर्णपणे कोलमडले आहे. आता भारतीय हवामान विभागाने देशातील काही राज्यांसाठी पुन्हा एकदा पावसाचा इशारा जारी केला आहे.हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, उत्तर भारतासह मध्य आणि पश्चिम भारतातील एकूण नऊ राज्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि लडाख या भागांमध्ये पुढील काही दिवस हवामान बिघडण्याचा अंदाज आहे.विशेषतः हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये ३ फेब्रुवारीपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी वाऱ्यांचा वेग ताशी



४० ते ५० किलोमीटरपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. डोंगराळ भागांमध्ये याचा परिणाम अधिक जाणवण्याची शक्यता आहे.दरम्यान, अरबी समुद्र आणि लगतच्या किनारपट्टी भागांमध्येही हवामानात बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे मच्छीमारांनी पुढील काही दिवस समुद्रात जाणे टाळावे, अशा सूचना संबंधित यंत्रणांकडून देण्यात आल्या आहेत. हवामानातील या बदलांमुळे शेती, वाहतूक आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता असून, नागरिकांनी अधिकृत हवामान अंदाजांवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## राहुल गांधी : सरकार व सैन्याचे खच्चीकरण करताहेत

काँग्रेसच्या राजवटीत चीनने तिबेट गिळंकृत केले आणि भारताचा असाई चीनचा प्रदेशही ताब्यात घेतला, आता तो अरुणाचल प्रदेशावरही हक्क सांगत आहे. १९६२ मधील युद्धात भारताला चीनकडून पराभव पत्करावा लागला; पण लडाख, गलवान यांसारख्या संघर्षात चीनला भारतापुढे माघार घ्यावी लागली. हा भारताचा चीनवरील लष्करी विजय होता. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून चीनला भारताची एक इंच जमीनही बळकावता आलेली नाही, हेच काँग्रेसचे खरे दु:ख. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रारंभी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्याच्या प्रस्तावावर, सोमवारी लोकसभेत चर्चा सुरू होती. तेव्हा विरोधी पक्षनेते असलेल्या राहुल गांधी यांनी कारण नसताना, लडाख क्षेत्रात भारत-चीन यांच्या सैन्यात उडालेल्या संघर्षावरून, भारतीय सैन्याचे मनोधैर्य खच्ची करण्याचा आणि राजकीय नेतृत्वावर दोषारोप करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधी यांना भाषण करण्यापासून रोखले, तेव्हा लोकसभेत गदारोळ माजला. परिणामी, लोकसभा दोन वेळा स्थगित करावी लागली. कारण, राहुल गांधी हे पुन्हापुन्हा एका अप्रकाशित आत्मवृत्ताचा हवाला देत, भारतीय सैन्यावर टीका करण्याचा प्रयत्न करीत होते. संसदीय कामकाजाच्या नियमांनुसार, ते तसे करू शकत नव्हते आणि हेच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला त्यांना वारंवार समजावून सांगत होते. तरीही, राहुल गांधी यांनी आपले म्हणणे रेटण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, तेव्हा अखेरीस लोकसभेचे कामकाज स्थगित करावे लागले. काँग्रेसच्या एका ज्येष्ठ मुस्लीम नेत्याने अलीकडेच राहुल गांधी हे 'भेकड' असल्याचा आरोप केला होता. त्याबद्दल काँग्रेस नेत्यांनी त्यांच्यावरच टीकेची धार धरली होती. पण, या नेत्यांचे मत किती खरे होते, त्याचाच प्रत्यय सोमवारी आला. लोकसभेतील वक्तव्यावर न्यायालयात खटला भरता येत नाही, या सुरक्षा कवचाचा आधार घेत राहुल गांधी हे भारतीय सैन्य आणि देशाच्या राजकीय नेतृत्वाची बदनामी करू पाहात होते. हेच वक्तव्य त्यांनी संसदेबाहेर करण्याचे धैर्य दाखवावे. तितकी त्यांची हिंमत नसल्याने आणि मूळ हेतू भारतीय लष्कर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करणे हाच असल्याने, ते लोकसभेचे सर्व नियम पायदळी तुडवून सरकारची व लष्कराची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यासाठी लोकसभेच्या संरक्षणाचा आधार त्यांनी घेतला आणि आपण भेकड नेते आहोत, ते दाखवून दिले. भारतीय सैन्याचे माजी प्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी आपले आत्मवृत्त लिहिले असले, तरी ते पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही. त्या पुस्तकातील एका भागाचा अंश एका मासिकात प्रसिद्ध झाला. याचा हवाला देऊन राहुल गांधी सदनात अर्धवट आणि दिशाभूल करणारे वक्तव्य करीत होते आणि त्यापासून त्यांना रोखण्यात आल्याने गदारोळ माजला. लोकसभेच्या नियमानुसार, कोणत्याची प्रकाशित वा अप्रकाशित पुस्तक वा मासिकातील मजकुराचा संदर्भ लोकसभेतील भाषणात देता येत नाही. तसेच केंद्रीय मंत्री वा पंतप्रधान यांच्याबद्दल आरोपसदृश्य वक्तव्य करायचे असेल, तर त्याची माहिती २४ तास आधी लोकसभा अध्यक्षांना देऊन त्यांची परवानगी घ्यावी लागते. यापैकी काहीही न करता, राहुल गांधी यांनी आपला राजकीय अजेंडा रेटण्याचा प्रयत्न केल्याने लोकसभेत गदारोळ झाला. या भागामध्ये माजी लष्करप्रमुख जन. नरवणे यांनी, २०२०-२१ मध्ये लडाखजवळील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारत व चीन यांच्या सैन्यात निर्माण झालेल्या तणावाचा संदर्भ दिला आहे. तेव्हा चिनी सैन्य व त्यांचे रणगाडे हे कैलास पर्वतराजीतील भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करीत होते. पण, तेव्हा भारतीय लष्कराने आपल्या बाजूकडील डोंगरांच्या माथ्यावर रणगाडे उभे केले. भारतीय सैन्य डोंगरमाथ्यावर असल्याने, युद्धाचा सर्व फायदा भारताला होत होता आणि त्यापुढे चीनचे काही चालले नाही. त्यांना आपले रणगाडे माघारीच न्यावे लागले. हे रणगाडे भारतीय हद्दीत येत असल्याचे पाहून, पुढील कारवाईसाठी जन. नरवणे यांनी तत्कालीन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना फोन लावला व पुढील कारवाईसाठी परवानगी मागितली. राजनाथसिंह यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी संपर्क साधल्यावर, 'जे योग्य वाटेल, ते करा' या एका वाक्यात मोदी यांनी लष्कराला कारवाईची पूर्ण सूट दिली. त्यामुळे भारताने आक्रमक धोरण स्वीकारून, आपले सैन्य त्या सरहद्दीलगतच्या सर्व डोंगरमाथ्यांवर उभे केले. ते पाहून घाबरलेल्या चीनने माघार घेतली. त्यानंतर दोन वर्षे लाखो भारतीय सैनिक व रणगाडे हे चीनच्या सरहद्दीवर पाय रोवून उभे होते. भारताची इतकी ठाम आणि आक्रमक भूमिका पाहिल्यावर, चीनला अखेर माघार घ्यावी लागली आणि दोन वर्षांपूर्वी दोन्ही बाजूंची सेना पुन्हा आपल्या तळांवर परतली. हा भारताचा चीनवर मिळविलेला पहिला लष्करी विजय होता. त्यानंतर गलवान खोऱ्यातही चिनी सैन्याच्या तुकडीला घुसखोरी करण्यापासून रोखण्यात आले. त्यात काही भारतीय सैनिकांप्रमाणेच चिनी सैनिकही मारले गेले पण, चिनी घुसखोरीला लगाम बसला. हा पूर्ण इतिहास न सांगताच, चीन भारतीय हद्दीत कसा घुसला आणि त्यापुढे मोदी काही करू शकले नाहीत, असा तद्दन खोटा इतिहास सांगण्याचा प्रयत्न राहुल गांधी करीत होते. त्याला लोकसभा अध्यक्षांनी चाप लावला. अर्थात, चीनची बाजू घेणे ही काँग्रेसची जुनीच सवय. १९४९ मध्ये तिबेट या स्वतंत्र देशावर आक्रमण करून तो संपूर्ण देशच कम्युनिस्ट चीनने आपल्या ताब्यात घेतला, तेव्हा तिबेट हा पूर्वीपासून चीनचाच भाग असल्याची पळपुटी भूमिका पं. नेहरू यांनी घेतली आणि चीनची सरहद्द थेट भारतभूमीपर्यंत भिडविली. १९६२च्या युद्धात असाई चीनचा प्रदेश चीनने ताब्यात घेतल्यावर लडाख हा पूर्ण वैराण प्रदेश असून, त्यावर गवताचे एक पातेही उगवत नाही, असे भाष्य याच नेहरूंनी केले होते. म्हणजे आपल्याच देशाचा एक भूभाग चीन ताब्यात घेत असल्याचे दिसत असूनही, त्याविषयी नेहरू अत्यंत बेफिकीर होते. पुढे इंदिरा गांधी यांनीही तामिळनाडूच्या सागरी सीमेवरील कच्छाथिवू हे भारताचे बेट श्रीलंकेला भेट दिले, जणू भारत हा नेहरू-गांधी घराण्याची खासगी जहागीर होती. पुढे सोनिया-मनमोहन सिंग सरकारने चीनबाबत अशीच बोटचेपी भूमिका घेतली. चीनच्या सरहद्दीच्या प्रदेशात रस्ते-पूल यांसारख्या पायाभूत सुविधा न उभारण्याचे अजब समर्थन करताना काँग्रेसचे तत्कालीन संरक्षणमंत्री ए. के. अण्टनी म्हणाले की, त्यामुळे चिनी सैन्याला घुसखोरी करणे कठीण होईल, अशी भारताची भूमिका आहे. असले अजब तर्कट जगात कोणी मांडले असेल काय? काँग्रेसकडून कायम चीनधार्जिणी भूमिका घेण्यामागे त्या देशाने 'राजीव गांधी फाऊंडेशन'ला दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीचा तर प्रभाव नाही ना? अशी शंका येते. काँग्रेसने तर चिनी कम्युनिस्ट पक्षाशी एक गुप्त करार केला आहेच पण, या करारात काय म्हटले आहे, ते काँग्रेसने कधीच उघड केले नाही. राहुल गांधी यांचा चिनी अजेंडा याच पद्धतीने रोखण्याची गरज आहे.

# पुणे शहराची भविष्यातील गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करण्यात येणार-मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वेगाने होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर व परिसर गुंतवणुकीचे आकर्षण बनले आहे. त्यामुळे पुणे शहर व परिसरात औद्योगिकरण वाढत आहे. नागरीकरणाचा वेगही गतिमान आहे, अशा परिस्थितीत भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



विमानतळासाठी भूसंपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कालमर्यादेत पूर्ण करून विमानतळ विकासाचा मोठा टप्पा पार करावा,असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी पुरंदर विमानतळ विकासकामांचा आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेची विशिष्ट पद्धत ठरविण्यात यावी. भूसंपादनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कार्यवाही पूर्ण करावी. विमानतळ विकासामध्ये सिडको, नगरविकास विभाग यंत्रणांनी आपली जबाबदारी निश्चित करून भूमिका यशस्वीपणे पार पाडावी. विमानतळ निर्माण झाल्यानंतर हा परिसर डेव्हलपमेंट झोन म्हणून पुढे येणार आहे. त्या अनुषंगाने सिडकोने परिसरात आत्ताच जमीन उपलब्धतेची खात्री करून घ्यावी.

राज्यातील विमानतळाचा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे आहे. कंपनीची क्षमता वृद्धी करून राज्यातील निर्माणाधीन असलेली सर्व विमानतळे विकासाकरिता कंपनीकडे देण्यात यावीत. पुरंदर विमानतळाच्या उर्वरित भूसंपादनाची अधिसूचना एमआयडीसीने काढावी तसेच निधीची उपलब्धतेबाबत विशिष्ट पद्धत ठरवण्यात यावी. विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आणावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

सद्यस्थितीत प्रस्तावित क्षेत्रापैकी १२१६ हेक्टर आर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करावी. या संयुक्त मोजणीचा, हरकतींचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव (उद्योग) पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी बैठकीत सहभाग घेतला.

या गावात भूसंपादनाची प्रक्रिया

पुणे जिल्ह्यातील वनपुरी, कुंभार वळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावात पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. या गावांमध्ये भूसंपादनासाठी गाव निहाय उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी दर्जाचे भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

पान १ वरून...

### पायाभूत सुविधा आणि औद्योगिक

विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करुन ती उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली.

चंद्रपूर जिल्ह्यातील अतिरिक्त गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रात उद्योजकास जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल, असेही त्यांनी उद्योगमंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले. बैठकीत 'एमआयडीसी' आणि 'एमएसआरडीसी'च्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

### राष्ट्रवादीत घडामोडींना वेग

असलेल्या राज्यसभेच्या जागेवर पार्थ पवार यांना पाठवले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही जागा लवकरच भरली जाण्याची शक्यता असून, त्यासाठी पार्थ पवार यांनी मोर्चेबांधणी सुरू केल्याची माहिती आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर पार्थ पवार आणि जय पवार हे दोघेही राजकारणात अधिक सक्रिय होतील, असा अंदाज वर्तवला जात होता. यापूर्वी बारामतीतील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात या दोघांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. आता अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी आली आहे. एकीकडे सुनेत्रा पवार राज्यात उपमुख्यमंत्री म्हणून सूत्रे सांभाळतील, तर पार्थ पवार दिल्लीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतिनिधित्व करतील, अशी शक्यता व्यक्त होत आहे. या संदर्भात पक्षाच्या बैठकीत पार्थ पवार यांनी वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. पार्थ यांनी यापूर्वी २०१९ मध्ये मावळ मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली होती. मात्र, त्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून

प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, आता अजित पवार यांच्या निधनामुळे या दोघांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. एकीकडे सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री म्हणून राज्यात सूत्रे सांभाळतील, तर जय पवार हे दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतिनिधित्व करतील, अशी शक्यता दिसत आहे. पक्षाच्या बैठकीत या संदर्भात पार्थ पवारांनी नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. याआधी सुद्धा पार्थ पवार यांनी मावळ मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक २०१९ मध्ये लढवली होती. मात्र त्यांचा पराभव झाला होता. शरद पवार हे मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी दिल्लीत जाणार होते. मात्र, त्यांचा हा दौरा अचानक रद्द झाला आहे. बारामतीवरून मुंबईला रवाना होण्यापूर्वी शरद पवार आणि प्रतिभा पवार यांनी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरात, जिथे अजित पवारांवर अंत्यसंस्कार करण्यात आले होते, त्या स्थळाला भेट दिली. तेथे त्यांनी विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त किरण गुजर यांच्याशी अजित पवारांच्या नियोजित स्मृतीस्थळासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर ते मुंबईला रवाना झाले, मुंबईतून ते दिल्लीला जाणार होते, मात्र, त्यांचा दिल्ली दौरा रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे.

## उल्का गुप्ता, ऐश्र्वर्या ओझा, अदिती भाटिया यांचे नवे पोस्टर रिलीज होताच चर्चेत 'केरल स्टोरी-२'

**मुंबई/प्रतिनिधी :** 'केरळा स्टोरी'नंतर आता 'केरळा स्टोरी २'चं नवं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं असून, या चित्रपटाची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे. 'त्रेशी इशेपव' या टॅगलाइनमुळे कथानक अधिक व्यापक असणार असल्याचे संकेत मिळत असून, उल्का गुप्ता, ऐश्र्वर्या ओझा आणि अदिती भाटिया यांच्या भूमिका महत्त्वाच्या ठरणार आहेत.

दिग्दर्शक आणि निर्माते विपुल शाह यांच्या बहुचर्चित चित्रपट 'केरळा स्टोरी'नंतर आता त्याचा सिक्केल 'केरळा स्टोरी २' पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. 'द केरळा स्टोरी २: गोज़ बियॉन्ड'मधील प्रमुख महिला कलाकारांचे कॅरेक्टर पोस्टर्स रिलीज करण्यात आले आहे. दिग्दर्शक, निर्माते विपुल अमृतलाल शाह द केरल स्टोरी २ घेऊन येत आहेत. याआधी त्यांनी आंखें, नमस्ते लंडन, सिंग इज़ किंग, फोर्स, कमांडो: अ वन मॅन आर्मी आणि हॉलिडे: अ सोल्जर इज़ नेवर ऑफ ड्युटी यांसारख्या चित्रपट आणले आहेत.

विपुल शाह आता द केरल स्टोरी २: गोज़ बियॉन्ड या सिक्केलसह परत येत आहेत. आगामी भागात अधिक गडद, अधिक खोल आणि अधिक अस्वस्थ करणारी कथा आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक कामाख्या नारायण सिंग यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाच्या टीझरमध्ये वास्तवाला भिडणारी कथा समोर येणार असल्याची झलक दिसते.

या चित्रपटात उल्का गुप्ता, ऐश्र्वर्या ओझा आणि अदिती भाटिया या अभिनेत्री प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. तिघीही वेगवेगळ्या पार्श्र्वभूमीतील पात्रं साकारणार असल्याचं बोललं जात आहे. पोस्टरमध्ये त्यांचा आत्मविश्र्वासपूर्ण आणि गंभीर लूक पाहायला मिळतो. हे दृश्य अत्यंत भयावह आणि अस्वस्थ करणारे आहे. प्रत्येक पोस्टरमध्ये अभिनेत्रींचा क्लोज-अप दाखवण्यात आला आहे, ज्यात अश्रूंनी भरलेला एक डोळा दिसतो, तर उरलेल्या अर्ध्या भागावर जखमा आणि वाहणारे अश्रू स्पष्टपणे जाणवतात.

निर्मात्यांनी हे पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. द केरल स्टोरी २: गोज बियॉन्ड ही तीन हिंदू मुलींची अस्वस्थ करणारी कथा आहे, प्रेम आणि नंतर छळ, शोषण...भीती, मानसिक आघातांच्या गर्तेत ते अडकतात. आशिन ए. शाह चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. सनशाइन पिक्चर्सच्या बॅनरखाली तयार झालेला हा चित्रपट २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी चित्रपटगृहात रिलीज होणार आहे.

# पदापेक्षा माणुसकी मोठी असते; जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा आदर्श निमित्त होते स्विय सहायकाच्या सेवानिवृतीचे

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** २ फेब्रुवारी रोजी एक प्रसंग पाहायला व अनुभवायला मिळाला,जो पद,अधिकार आणि प्रशासनाच्या चौकटीपलीकडे जाऊन माणुसकीचे खरे दर्शन घडवणारा ठरला. जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या संवेदनशील,आपुलकीच्या आणि माणुसकीने ओतप्रोत भरलेल्या स्वभावाची प्रचिती पुन्हा एकदा आली.






सेवेची तब्बल ३५ वर्षे पूर्ण करून जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक श्री.दत्तात्रय कुलकर्णी २ फेब्रुवारी रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. प्रशासनात कार्यरत असताना त्यांनी प्रामाणिकपणे,निष्ठेने व समर्पित भावनेने आपली जबाबदारी पार पाडली.अशा निष्ठावान कर्मचाऱ्याचा सन्मान हा केवळ औपचारिक न राहता,मनापासूनचा असावा,याचे जिवंत उदाहरण २ फेब्रुवारी रोजी पाहायला मिळाले. सेवापूर्ती कार्यक्रमानंतर सायंकाळी ७.३० वाजता जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी एक अत्यंत भावस्पर्शी निर्णय घेतला.स्वतःच्या शासकीय वाहनात,श्री.कुलकर्णी साहेबांना स्वतःच्या जागेवर बसवून,स्वतः मात्र समोर सुरक्षा रक्षकाच्या जागेवर बसून त्यांना घरी सुखरूप पोहोचवले आणि त्यानंतरच आपल्या शासकीय निवासस्थानी परतले.

हा केवळ एक प्रसंग नव्हता,तर अधिकारीकर्मचारी नात्यातील जिव्हाळा, प्रामाणिकपणाला मिळालेली माणुसकीची पावती आणि नेतृत्व म्हणजे काय याचा आदर्श ठरलेला क्षण होता.अधिकारी असूनही कर्मचाऱ्यांवर कुटुंबातील सदस्यासारखे प्रेम करणारे,त्यांच्या कार्याचा आदर करणारे आणि माणुसकी जपणारे जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार अनेकांच्या मनात आदराने घर करून गेले.अशा संवेदनशील,माणुसकीने भरलेल्या नेतृत्वाला मनापासून वंदन.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा करार महत्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :''महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएमउमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील पाच



हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.

**महिला शेतकरी सक्षमीकरणाच्या दिशेने महत्वाचे पाऊल**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**उपक्रमाची व्याप्ती आणि उपयुक्तता**

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारहून अधिक महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी गोदरेज ॲग्रोव्हेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अंतर्गत महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) याबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्य शासन महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेशी जोडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला शेतकरी वर्गाला सक्षमकरण्याच्या दिशेने हे निश्चितच एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

ही तीन वर्षांची भागीदारी स्वयं-सहायता गट (एसएचजीएस) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करेल, ज्यामुळे शेती उत्पादनक्षमता वाढून शाश्वत व सक्षम उपजीविका निर्माण होणार आहे.

**५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट यांना उपक्रमाचा लाभ**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. ५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पिक उत्पादक शेतकऱ्यांपर्यंतही हा उपक्रम पोहोचवण्याचा मानस आहे.

या कराराअंतर्गत एमएसआरएलएमउमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज ॲग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत, गोदरेज ॲग्रोवेट आणि एमएसआरएलएम उमेद संयुक्तपणे जीएपी, आपीएम आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा , प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत.

# भारत-अफगाणिस्तान सेमी फायनलमध्ये भिडणार!

**मुंबई/प्रतिनिधी** : आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. स्पर्धेतील सुपर ६ फेरीतील सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी विजयाची नोंद केली. या विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. सेमी फायनलमध्ये होणाऱ्या सामन्यात भारतीय संघाचा सामना अफगाणिस्तान विरुद्ध होणार आहे. हा सामना जिंकून भारतीय संघ फायनलमध्ये प्रवेश करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. दरम्यान हा सामना केव्हा, कधी आणि कुठे खेळवला जाईल?

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर ५८ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात फलंदाजी करताना कनिष्क चौहानने दमदार खेळी केली. त्याने २९ चेंडूत ३५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने २५२ धावांपर्यंत मजल मारली. पाकिस्तानला हा सामना जिंकण्यासाठी २५३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संपूर्ण डाव १९४ धावांवर आटोपला.

भारतीय संघाने गेल्यावेळी देखील स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला होता. या सामन्यात भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. पण यावेळी आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ तुफान फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे भारतीय संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात होणारा सेमी फायनलचा सामना ४ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. हा सामना हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर खेळवला जाईल. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १ वाजता सुरू होईल.

## छत्तीसगडमध्ये जातीय तणाव उफाळला; ६ घरे जाळली, परिस्थिती नियंत्रणात आणताना पोलीस जखमी

गरियाबंद : छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात जातीय दंगलीची घटना घडली आहे. ही घटना दुतकैया या कमी लोकसंख्येच्या गावात घडली. रविवारी (०१ फेब्रवारी) एका जमावाने अल्पसंख्याक समुदायातील ६ लोकांची घरे जाळण्याचा प्रयत्न केल्यानंतर मोठा हिंसाचार उसळला होता. दरम्यान, पोलिसांच्या एका छोट्या पथकाने अनेक लहान मुलांसह २० जणांना वाचवले. यावेळी सात पोलीस कर्मचारी जखमी झाले. रविवारी पहाटे झालेल्या काही घटनांमुळे दंगल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. दंगल होण्यापूर्वी काही तास अगोदर चार वेगवेगळ्या ठिकाणी चार जणांवर हल्ला करण्यात आला आणि दोघांचे मोबाईल फोन लुटण्यात आले होते. या घटनांमधील तीन आरोपींची ओळख पटली आहे.

# अजित पवारांच्या अंत्यसंस्कारावेळी २०.५० लाखांची चोरी

## बारामती पोलिसांकडून सात आरोपी अटकेत

**दैनिक आपला विदर्भ**

**बारामती /प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारावेळी झालेल्या प्रचंड गर्दीचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्यांनी उपस्थित नागरिकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या आणि रोख रक्कम असा अंदाजे २० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याची घटना उघडकीस आलीय. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, बारामती तालुका पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सात चोरट्यांना अटक केलीय.

**सोन्याच्या साखळ्या आणि रोख रक्कम चोरीस गेल्याचे स्पष्ट :** अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये राजकुमार बाबुराव आठवले (रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड), मोहम्मद अनिस मोहम्मद युनूस, एजाज भगु मीरावले, मोहम्मद सादिक मोहम्मद गफार (सर्व रा. गवळीपुरा, डिग्रज, जि. यवतमाळ), बाळू उर्फ दत्तात्रय बबन धोत्रे (मूळ रा. इंदिरानगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर; सध्या रा. पळसदेव, ता. इंदापूर, जि. पुणे), तुषार कैलास मासाळ (रा. कोरडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) आणि नितीन अंकुश गायकवाड (रा. शिक्षक कॉलनी, जि. बीड) यांचा समावेश आहे. तपासात फिर्यादी रणजित बाळासाहेब जाधव तसेच साक्षीदार विश्वजीत अनिल तुपे, अंकुश शांताराम दिघे, प्रशांत लक्ष्मण सपकाळ, विकास कैलास भागवत, रणजीत मधुकर भोंगळे आदींच्या सोन्याच्या साखळ्या आणि रोख रक्कम चोरीस गेल्याचे स्पष्ट झालंय.



**गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली :** चोरी गेलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे २० लाख रुपये असल्याचे निष्पन्न झालंय. गुन्हा दाखल होताच बारामती पोलिसांनी तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. आरोपींकडून चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमाल आणि रोख रक्कम हस्तगत करण्यासाठी कसून चौकशी सुरू असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड आणि पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलीय. तपासात पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुरेंद्र वाघ, पोलीस हवालदार किशोर वीर तसेच पोलीस अंमलदार राजू बन्ने, मनोज पवार, जितू शिंदे आणि हनुमंत खटके यांनी सहभाग घेतलाय.

# पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड; लातूर दौरा तात्पुरता बंद

**दैनिक आपला विदर्भ**

**लातूर/प्रतिनिधी :** भाजप नेत्या आणि कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचा यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची प्राथमिक बातमी समोर येत आहे. समावेश आहे. मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला, ज्यामुळे त्यांना त्यांचा हेलिकॉप्टर प्रवास पुढे ढकलावा लागला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी पंकजा मुंडे संभाजीनगरहून लातूरला हेलिकॉप्टरने जाणार होत्या. परंतु, पायलटने तांत्रिक बिघाडाची आगाऊ तक्रार केल्याने त्यांना त्यांचा प्रवास पुढे ढकलावा लागला.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांनी प्रचार सभेला सुरुवात केली आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या



निवडणुकीत भाजप मोठ्या ताकतीने उमेदवारांच्या पाठीमागे उभे राहत असल्याचे चित्र दिसत आहे. किनगाव गणातील उमेदवारांच्या प्रचारार्थ किनगाव येथे आज सकाळी १२ वाजता पंकजा मुंडे यांची प्रचार सभा होणार होती.

नेमकं घडलं काय ?

भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्या छत्रपती संभाजीनगर येथून लातूरकडे जाणाऱ्या हेलिकॉप्टरमध्ये ऐनवेळी तांत्रिक बिघाड झाल्याने हा दौरा काही काळासाठी थांबवण्यात आला आहे. पंकजा मुंडे आज (मंगळवार ३ फेब्रुवारी) सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून हेलिकॉप्टरने लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यासाठी निघणार होत्या. मात्र, उड्डाणापूर्वीच हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे निदर्शनास आले, ज्यामुळे त्यांचा प्रवास लांबणीवर पडला आहे.

हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्याचे समजताच पंकजा मुंडे यांनी विमानतळावर जाण्याऐवजी हॉटेलमध्येच थांबणे पसंत केले. सुरक्षिततेच्या कारणास्तव तांत्रिक तपासणी पूर्ण होईपर्यंत उड्डाण रद्द करण्यात आले आहे. दरम्यान, पक्षाकडून आता दुसऱ्या हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात येत आहे.


# शब्दकोडे क्र. 76

आडवे शब्द

१. नारळाचा अर्धा भाग ३. मालिश ५. पाऊल ९. खटला, दावा १०. थांबून थांबून, विश्रांती घेत १२. नेत्रकटाक्ष १५. राग आणणारे १८. औषधाचे प्रमाण १९. कार्य, काज २०. एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती अशाप्रकारे २१. झाकण असलेले पात्र २३. विष्ठेचे खत २४. माणूस २६. वर्तमानपत्रातील कप्पा २८. अपवित्र ३०. कर्ण ३१. रसाळ ३३. अनावश्यक, नको असता ३५. कावळ्याचे ओरडणे ३६. बाजेची कापडी पट्टी ३७. अपशकुन ३८. कुरआनातील आयात (ेक) ३९. मारणे ४१. संभाषण ४६. चेहऱ्यावरील कांती ४९. विद्वत्ता असली तरी घमेंड नको हे सांगणारा वाक्प्रचार ५३. तारांब, धांदल ५५. चंद्राची कड ५६. नामी युक्ती ५८. पातळसर ६०. मुलांची मांजर ६१. सगळी ६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य ६३. दक्ष ६५. धनादेश ६७. तरुण्य ६८. उत्तराधिकारी ७०. ऐनवेळेला कच खाणारा ७३. पत्नी ७५. ऋण ७६. राख ७७. वाळलेले गवत, जनावरांचे खाद्य ७८. पसरलेले, विस्तृत

उभे शब्द

१. दयामया नसलेला २. नमस्कार ३. गम्माडीगंमत ४. मानवी कत्तल ५. गुरांचा समूह ६. कामदेव ७. आनंद ८. सुंदर डोळ्यांची ९. पदार्थाचा सूक्ष्म भाग १०अ. वानर ११. कामापुरते नाते १३. मृत्यूदेवता १४. चोख सोन १६. वडील १७. तरुण, सैनिक २०. यालाच जगन्नाथ समजावे! २२. पोते २३. शिडी, पायरी २४. माणुसकी २५. आशीर्वाद २७. कृती २९. न दिसणारी जखम ३०. चुलता ३२. पशू ३४. शक्ती, क्षमता ४०. बाराचा संच (इंग्रजी) ४२. बातमी ४३. शास्त्र, कला ४४. अंतःकरण ४५. आत्याचा मुलगा ४७. देवदर्शनासाठी फिरणारा ४८. अधिक श्रेष्ठ ४९. दगाफटका करणारा ५०. नम्र ५१. कर्जाऊ रक्कम ५२. दुःख ५४. घर ५६. हिशोब (हिंदी) ५७. तत्काळ, लगेच ५९. शरीराची ठेवण ६३. शिर्डीचे संत ६४. अभिनव ६५. उत्साह, जोम ६६. सिंह राशीतील नक्षत्र ६९. पुढचे पाठ आणि मागचे ---! ७०. लेखी विनंती ७१. ताठा, गर्व ७२. एखाद्याची बाजू घेणे, कार्यात हातभार लावणे म्हणजे -- उचलणे ७४. वरिष्ठांचा राग, संताप



## शब्दकोडे क्र. 75 चे उत्तर

आडवे उत्तर

१.सुंदर ३.वारेमाप ६.अलग अलग १०.वारकरी १२.लव १३.गड १४.वाचाळ १६.दानवीर १८.करामत २०.चूल २१.मग २२.सार २३.रबडी २४.धड २५.सगळीकडे २९.केर ३१.खोडकर ३३.पसायदान ३५.शतक ३७.करवा ३९.जरतर ४१.वहाण ४३.रसदार ४७.मलमल ४८.गेह ४९.रमतगमत ५२.पंकज ५४.नर ५५.नगरसेवक ५९.पावशेर ६१.मळमळ ६२.नास ६३.साल ६४.पात ६५.वदन ६७.नकार ६८.नमक ७०.वळकटी ७१.मध ७३.नवल ७५.नस ७६.अमोल ७८.नमस्कार ८०.रक्षक ८३.गवार ८५.कप्तान ८६.तरातर ८७.मदिरा ८८.यातना ८९.तराणे

उभे उत्तर

१.सुंठेवाचून खोकला गेला २.रवाळ ३.वारी ४.मालदार ५.पवन ६.अगरबत्ती ७.लड ८.अपराध ९.गवत ११.करंगळी १५.चाल १७.वीर १९.मडके २१.मगर २२.साडेसाती २५.सकवार २६.कप २७.अंदाज २८.अंत ३०.रमण ३२.डर ३४. नरम ३५.शरम ३६.कव ३८.बदाम ४०.तलवार ४२.हाटक ४४.सरतेशेवटी ४५.रतन ४६.रोम ५०.गरम ५१.तनमनधन ५२.पंक ५३.जहाल ५६.गळका ५७.सेना ५८.वसन ५९.पातळसर ६०.रद ६३.साकव ६४.पावन ६६.नटम ेगरा ६९.मन जिंकणे ७२.फारकत ७४.लहान ७७.लवा ७९.महिना ८१.क्षत ८२.करा ८४.रया

वृत्तविशेष...

## उबाळखेड ग्रामपंचायत मध्ये लाखोंचा अपहार झाल्याचा आरोप, ग्रामस्थांची चौकशीची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाण्याच्या मोताळा तालुक्यातील उबाळखेड ग्रामपंचायत मध्ये सरपंच आणि ग्रामसेवक हे इतर सदस्य व गावकऱ्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार चालवत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे, ग्रामपंचायत मार्फत आजपर्यंत झालेली विकास कामे आणि जमा खर्चाची माहिती मागितली असता ती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याने, लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा संशय गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे, या संपूर्ण कारभाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांनी केली आहे, अन्यथा आठवडाभरानंतर तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

## महिला व बाल विकास यंत्रणेतील कर्मचारी आक्रमक; काळ्या फिती लावून कामकाज



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महिला व बाल विकास विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि अंगणवाडी यंत्रणेच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांकडे शासनाने केलेल्या दुर्लक्षाविरोधात कर्मचारी आक्रमक झाले आहेत, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, सीडीपीओंसह सुमारे सहा हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २ फेब्रुवारीपासून आंदोलनास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र राज्य महिला व बाल विकास विभाग राजपत्रित अधिकारी संघटना व इतर सहयोगी संघटनांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २ आणि ३ फेब्रुवारी रोजी काळ्या फिती लावून निषेध.. ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व माहिती देवाण-घेवाण बंद.. ९ ते ११ फेब्रुवारी संपूर्ण काम बंद.. तर १२ फेब्रुवारी रोजी सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे, मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## सिंदखेडराजा बाजार समिती सचिवांच्या मालमत्तेचा ६ फेब्रुवारीला जाहीर लिलाव जमीन महसूल थकबाकी वसुलीसाठी महसूल विभागाची कठोर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** कृषी उत्पन्न बाजार समिती, सिंदखेडराजा येथील सचिवांकडे प्रलंबित असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी महसूल विभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

वारंवार सूचना देऊनही थकबाकीचा भरणा न केल्याने, संबंधित सचिवांची मालमत्ता जप्त (समपहरण) करण्यात आली असून, येत्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार, सिंदखेडराजा यांनी दिली आहे.मौजे सिंदखेडराजा,गट क्रमांक ५५/१अ, क्षेत्र २.०२ हेक्टर, आकार ३२३२/- रुपये. आणि मौजे किनगावराजा, गट क्रमांक ७८५, क्षेत्र ०.८१ हेक्टर, आकार ७.५०/- रुपये असे या मालमत्तेचे वर्णन आहे.या मालमत्तेचा जाहीर लिलाव दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २:०० वाजता तहसील कार्यालय, सिंदखेडराजा येथे आयोजित करण्यात आला आहे.

तहसीलदारांनी निर्गमित केलेल्या नोटीसनुसार, लिलावाच्या दिवसापूर्वी थकबाकीची संपूर्ण रक्कम भरली न गेल्यास मालमत्ता सर्व भारांपासून मुक्त मानून जाहीर लिलावाद्वारे विकली जाईल. या प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी विहित वेळेत तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन महसूल प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.



# नेत्याला अखेरचा निरोप लोणार मध्ये भावनिक अस्थिकलश दर्शन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**लोणार** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्यांचा अस्थिकलश आज लोणार येथे आणण्यात आला.अस्थिकलशाचे शेकडो नागरिकांनी दर्शन घेऊन वंदन केले.

यानंतर लोणार येथे शिवहरी कॉम्प्लेक्स येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह विविध पक्षांचे व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच लोणार तालुक्यातील नागरिकांच्या उपस्थितीत शोकसभा पार पडली. अत्यंत भावपूर्ण वातावरणात सर्व उपस्थितांनी स्व. अजितदादांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेतले.

पक्षाच्या पलीकडे जाऊन स्व. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या मोठी असून, आपल्या कार्यातून व कर्तृत्वातून त्यांनी जनतेची आपुलकी आणि जिव्हाळा कमावला होता, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शोकपर मनोगतातून उपस्थित मान्यवरांनी स्व. अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या शोकसभेस आमदार मनोज कायंदे माजी मंत्र राजेंद्र शिंगणे , जिल्हा अध्यक्ष नाझेर काझी,नरेश शेळके,सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह विविध पक्षांचे व संघटनांचे आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री उभारणीसाठी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद

### ७ ते २३ फेब्रुवारी दरम्यान वाशिम-बुलढाणा जिल्ह्यात ब्लॉक



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यात आले आहे. हे काम वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील विविध टप्प्यांवर दि. ७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एकूण ३५ टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गावरील कि.मी. १७८+९०० ते २९०+४०० दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड), मंगरुळपीर, मालेगाव तसेच बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातून जाणाऱ्या मार्गावर ही गॅन्ट्री उभारली जाणार आहे. या कामासाठी संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून, काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक तत्काळ सुरू करण्यात येईल. महामार्गावरील मुंबई व नागपूर दिशेने जाणाऱ्या वाहतुकीवर ठराविक वेळेत परिणाम होणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा व प्रवासाचे नियोजन करूनच मार्गक्रमण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कामाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे :

दि. ७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध तारखांना रात्री १२ ते १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत, मुंबई व नागपूर वाहिनीवर अनुक्रमे कि.मी. १७८.९००, १७९.७५०, १८३.७००, १८५.५००, १९०.४००, २००.४००, २०५.४००, २०८.२००, २०८.८५०, २३८.५५०, २४२.६००, २४५.४००, २५०.५००, २६०.४००, २६४.८००, २७०.४००, २८०.४००, २८१.४०० व २८३.९०० या ठिकाणी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक पोलिस, महामार्ग प्रशासन व सूचना फलकांचे पालन करावे, असेही महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेकरीता नोंदणी आणि आवेदनपत्रासाठी १३ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी) दि. २६ एप्रिल २०२६ रोजी एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरीता शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे. सुधारित वेळापत्रकानुसार शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी नियमित शुल्कासह १३ फेब्रुवारी, विलंब शुल्कासह १४ ते २० फेब्रुवारी, अतिविलंब शुल्कासह २१ ते २४ फेब्रुवारी तर अति विशेष विलंब शुल्कासह २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नसल्याचे परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

## मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरण, शीतल तेजवानीविरोधात १८८६ पानांचं दोषारोपपत्र न्यायालयात दाखल

**पुणे/प्रतिनिधी:** पुण्यातील मुंढवा येथील जमीन गैरव्यवहार प्रकरणाची राज्यभर चर्चा झाली होती. या प्रकरणात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आले होते. या प्रकरणात मुख्य आरोपी शीतल तेजवानी हिला अटक करण्यात आली होती. आता या प्रकरणात पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं शीतल तेजवानी विरोधात १८८६ पानी दोषारोपपत्र पुणे न्यायालयात दाखल केलं असून, पार्थ पवारांचा या पत्रात उल्लेख दिसत नाही.

काय आहे नेमकं प्रकरण? - पुण्यातील मुंढवा येथील सर्व्हे क्रमांक ८८ येथील ४० एकर शासकीय भूखंडाचं बाजारमूल्य १८०० कोटी रुपये असताना केवळ ३०० कोटी रुपयात ही जागा विक्री करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला होता. तसंच या जागेच्या खरेदीखतावेळी ५०० रुपयांचा भरणा करुन दस्त नोंदणी केली होती. नियमानुसार २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरणं आवश्यक होतं. शीतल तेजवाणीनं ही जमीन पार्थ पवार भागीदार असलेल्या ॲमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील यांना विकली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात तहसीलदार, दिग्विजय अमरसिंह पाटील आणि मुख्य आरोपी शीतल तेजवानी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर फरार शीतल तेजवानी हिला अटक करण्यात आली होती.

# मेहकर शोकसागरात; स्वर्गीय अजितदादा यांच्या अस्थिकलश दर्शनाला जनसागर





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** राज्याचें उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आज मेहकर येथे अस्थिकलश दर्शनाचा कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला. अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दु:खद निधन झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनामुळे राज्याने एक प्रभावी नेतृत्व गमावल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

आज मेहकर नगर परिषद मैदानात अस्थिकलश दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाने अश्रूंनी डोळे भरून अस्थिकलशाचे दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, सिंदखेडराजा येथील आमदार मनोज कायंदे, मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे, माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सर्वांनी अजित पाटील यांच्या आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही मोठ्या भावनेने सहभाग घेत आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. संपूर्ण परिसरात शोकाकुल वातावरण पाहायला मिळाले.

# बुलढाणा जिल्हा ‘कॉपीमुक्त’ करण्यासाठी प्रशासन सज्ज

## १० वी आणि १२ वीच्या परीक्षांसाठी कडक निर्बंध

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा, दिनांक ०३(जिमाका): राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षा जिल्ह्यात पारदर्शक, भयमुक्त आणि ‘कॉपीमुक्त’ वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील दक्षता समितीने या संदर्भात कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, परीक्षा केंद्रांवर कडक देखरेख ठेवण्यात येणार आहे.


यंदाच्या परीक्षेत जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्याचे नियोजन खालीलप्रमाणे आहे:

✻ इयत्ता १२ वी: १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ (विद्यार्थी: ३५,२११ । केंद्र: ११७)

✻ इयत्ता १० वी: २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ (विद्यार्थी: ४०,८२८ । केंद्र: १६१)

परीक्षा केंद्रांवर ‘कलम १४४’ लागू:परीक्षेच्या कालावधीत गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परिसरात कलम १४४ (जमावबंदी) लागू करण्यात आली आहे. तसेच, केंद्राच्या परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, कॉम्प्युटर सेंटर्स आणि मोबाईल सेंटर्स परीक्षा सुरू होण्यापूर्वी २ तास आधीपासून परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्रिस्तरीय सुरक्षा आणि देखरेख व्यवस्था: प्रशासनाने परीक्षेच्या गोपनीयतेसाठी आणि शिस्तीसाठी व्यापक यंत्रणा तैनात केली आहे:

०८ भरारी पथके: जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी,



पोलीस अधीक्षक आणि शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके कार्यरत राहतील.

सी.सी.टी.व्ही. पाळत: जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर आणि १६ परिरक्षक केंद्रांवर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

बैठे पथक: प्रत्येक केंद्रावर महसूल विभागाचे ‘बैठे पथक’ तैनात असेल, जे पेपर सुरू होण्यापूर्वी १ तास  धी केंद्रावर उपस्थित राहील.वाहतुकीसाठी कडक नियम:पेपरची गोपनीयता राखण्यासाठी परिरक्षक केंद्रावरून प्रश्नपत्रिका नेण्यासाठी आणि उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी केवळ चारचाकी वाहनांचाच वापर अनिवार्य करण्यात आला आहे. कोणत्याही शिक्षकाला किंवा रनरला मोटारसायकल वापरण्यास सक्त मनाई आहे.

जिल्हा प्रशासनाचे आवाहन:

‘‘कॉपीसारख्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. भावी पिढी सक्षम घडवण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याला तणावमुक्त वातावरणात परीक्षेसाठी प्रोत्साहित करावे. तसेच, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही परीक्षा प्रक्रिया पूर्णतः पारदर्शकपणे पार पाडावी,‘‘ असे आवाहन जिल्हाधिकारी व दक्षता समितीने केले आहे.